# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १२/०२/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. सावनेर:— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा पाटणसावंगी शिवाजी चौक सावनरे येथे दिनांक ०५/०२/२२ चे १९.३० वा. दरम्यान अज्ञात आरोपी वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वगाने व निष्काळजीपणे चालवून पायदळ जाणाऱ्या **रमेश महादेव खडसे (मृतक), वय ४० वर्ष रा. देवी ता. सौंसर जि. छिंदवाडा ह. मु. भेंडाळा ता. सावनेर** यास धडक दिली. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता दि. १०/०२/२०२२ रोजी सायंकाळी ०७.४५ वा. उपचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कैलास महादेव खडसे वय ४१ वर्ष, रा भेंडाळा ता सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९ ३०४ (अ) भादवी १३४(ब), १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री फुलेकर पो.स्टे. सावनेर मो. क्र. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत २५ कि. मी. मौजा टेमसना येथे दिनांक ११/०२/२०२२ चे ०९.४१ वा. चे १५.४३ वा. दरम्यान फिर्यादी नामे— मंगेश दिलीप भालेराव, वय २८ वर्ष, रा. टेमसना ता. कामठी यांनी वृत्तपत्रात नोकरी ची जाहीरात बघून आरोपी यांचे मोबाईल वर कॉल केला. यानंतर आरोपीने फिर्यादीला विश्वासात घेवून फिर्यादी कडून आरोपीने ८१,३९५/— रू. घेवून फिर्यादीची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर